जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा

दरपत्रक/निविदा सुचना

सी–१८(१)/9688/१९९०, दिनांक: 15 /०५/२०२६

सुचना फलक

जिल्हा न्यायालय, भंडारा व त्याअंतर्गत असलेल्या तालुका न्यायालयामध्ये एकुण १० Photocopy मशिन कार्यरत असून त्यांचा नविन सेवा संविदा करार करणे आहे. Photocopy मशिनबाबत सेवा संविदा करार करण्यासाठी पुरवठादारांकडून खालील अटी व शर्तीवर बंद स्वरुपात दरपत्रक/निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक व्यक्ती/पुरवठादारांनी दिनांक २९/०५/२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा, यांचे नावे निम्नलिखित पत्त्यावर बंद लिफाफयावर ''**Photocopy मशिन सेवा संविदा करार**'' असे लिहून दरपत्रक/निविदा सादर करावे.

पत्ता:– जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा
राष्ट्रीय महामार्ग क्र. ५३, भंडारा, पिन क्र.४४१९०४

अटी व शर्तीः–

१. मासिक रिडींगप्रमाणे एकूण किती कॉपींवर ठराविक युनिट दर राहिल व पुढील प्रत्येक कॉपीकरीता किती युनिट दर राहिल.

२. परवानाधारक/अधिकृत पुरवठादार झेरॉक्स यंत्राच्या सर्व प्रकारच्या सेवा, सुटे भाग व उपभोग्य वस्तू नि:शुल्क/मोफत पुरवतील.

३. मासिक बिल प्रती मशिनकरिता सेल टॅक्स व वॅट टॅक्स(जीएसटी) सह देतील.

४. यंत्राला सुटे भाग (Spare parts) ची आवश्यकता असल्यास यंत्र ४८ तासांपेक्षा जास्त कालावधीकरीता बंद स्थितीत ठेवता येणार नाही. तसेच तातडीने यंत्र दुरुस्ती करुन दयावे लागेल.

५. परवानाधारक/अधिकृत पुरवठादार हे बंद असलेल्या एकूण ०९ मशिन ऐवजी ०९ Stand by मशिन पुरवतील व कार्यरत असलेल्या ०१ मशिन भविष्यात बिघडल्यास त्याऐवजी Stand by मशिन पुरवतील.

६. चालू असलेला करार हा दोन पैकी कोणत्याही पक्षाने एक महिण्यापूर्वी पूर्वसूचना देवून संपुष्टात आणता येईल.

दिनांक २९/०५/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. तसेच निविदा स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, भंडारा, यांचा राहील.

हुकूमावरुन
15/5/26

प्रबंधक
जिल्हा न्यायालय, भंडारा.

दिनांक : 15 /०५/२०२६.

zerox.odt.